Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2024-25/001 Date: 01.07.2024

## सुचना
## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता द्वितीय वर्ष शाखा बदलाने प्रवेशाबाबत...

संदर्भ : १. १० / एडीएम / विद्यार्थी बदली / २०२४ / २७८, दि. २९.०६.२०२४.
२. १० / एडीएम / विद्यार्थी संस्था बदल / २०२४ / २७९, दि. २९.०६.२०२४.

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नियमित द्वितीय वर्षात शाखा बदलाने प्रवेशास ईच्छूक विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अशा विद्यार्थ्यांनी संदर्भिय पत्रातील निर्देश व नियमावलींच्या आधीन राहून शाखा बदलाकरीता खाली नमुद कागदपत्रांसह शुक्रवार, दि. ०५.०७.२०२४ पर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात संपर्क साधावे**; अन्यथा होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टिप :

१. प्रथम वर्ष इनचार्ज व सर्व विभागप्रमुखांनी आपल्या स्तरावरून नियमित द्वितीय वर्षात शाखा बदलाने प्रवेशास ईच्छूक सर्व विद्यार्थ्यांना सदर बाबतीत अवगत करावे.

२. "Admission Cell" विभागाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी द्वितीय वर्षात शाखा बदलास ईच्छुक होते; अशांना आपल्या स्तरावरून सपर्क करून सदर बाबतीत अवगत करावे.

आवश्यक कागदपत्रे :

**१. विद्यार्थ्याचे लेखी अर्ज (पालकांच्या मान्यतेसह).**
**२. कार्यालयात किंवा संदर्भिय पत्रासोबत उपलब्ध विहित नमुन्यातील अर्ज - Annexure – 'A'.**
**३. प्रवेश निश्चिती पत्र (Admission Confirmation Letter).**
**४. प्रथम व द्वितीय सत्राचे गुणपत्रक(I & II Sem. Marksheet).**
**५. पात्रता प्रमाणपत्राकरिता आवश्यक फि रू. २००/-**

सोबत :
सुलभ संदर्भ व अधिकच्या माहितीकरीता संदर्भिय पत्र.

A. G. PATIL POLYTECHNIC INSTITUTE * SOLAPUR *

डॉ. एम. ए. चौगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्युट
सोलापूर.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ईमेल- – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

परिपत्रक : कालमर्यादा दि.०८/०७/२०२४

क्रमांक : १०/एडीएम/विद्यार्थी बदली/२०२४/२८८ दिनांक : 29 JUN 2024

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल व पहिल्या/दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करणेबाबत

संदर्भ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमाचे माहिती पुस्तक

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याची बाब माहिती पुस्तकामध्ये नियम क्र.१६ अन्वये नमूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली असून त्यानुसार पाठ्यक्रम व संस्था बदलासाठी प्रमुख पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माण-शास्त्र पदविका पाठ्यक्रम / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम/संस्था बदलीस विनंती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विनंती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता |

२. पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज (अर्जाचा नमुना Annexure A) ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल / संस्था बदल पाहिजे, अशा शैक्षणिक संस्थेकडे खालील कागदपत्रांसह दि. ०८ जुलै, २०२४ पर्यंत सादर करावा. सदर दिनांकानंतर तसेच अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेल्या अर्जांबाबत काहीही न कळविता, असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

- क) संस्था बदलासाठीचा अर्ज (सोबत जोडलेल्या नमुन्यात)
- ख) सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र
- ग) बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र
- घ) ज्या वर्षासाठी (दुसरे/तिसरे) संस्थाबदलासाठी अर्ज केला आहे,त्या वर्षापूर्वीच्या सर्व सत्रांच्या गुणपत्रिकांच्या साक्षांकित प्रती
- ङ) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पात्रता प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)
- च) शिक्षणात खंड असल्यास ज्या शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक खंड आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) किंवा रु.१००/-च्या स्टँप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र.
- छ) प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास).
- ज) संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठयर्थ पुरावे

३. संस्था बदलाकरीताच्या अर्जासोबत परिच्छेद क्रमांक २ (क ते ज) नमूद केलेल्या कागदपत्रांसह परिपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील, याची नोद घ्यावी.

४. विद्यार्थ्यांनी सध्या शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्थेकडून फक्त ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे, लिव्हींग सर्टीफीकेट घेऊ नये, संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट घ्यावे.

५. प्रथम / द्वितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही.

६. विद्यार्थ्यांना विद्यमान संस्थेमधून दुसऱ्या कोणत्याही संस्थेमध्ये बदलून जाण्याची तरतूद माहिती पुस्तिकेतील अनुसूची-५ मध्ये नमूद करण्यात आली आहे. (सोबत प्रत जोडण्यात येत आहे.)

७. अधिसंख्य (Over & Above) कोटयातील जागेअंतर्गत प्रवेशित विद्यार्थी (Admitted under Supernumerary Quota seats) पाठ्यक्रम किंवा संस्था बदलासाठी पात्र नाहीत.

८. संस्था बदलासाठीच्या प्रक्रियेपूर्वी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थ्यांचा शाखा बदल, संस्था बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

९. संस्था बदल ज्या संस्थेत पाहिजे आहे, त्याच संस्थेकडे विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज जमा करावयाचा असून या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे विद्यार्थ्यांनी थेट अर्ज करू नये. या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे प्राप्त होणाऱ्या थेट अर्जावर कोणतीही कार्यवाही होणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

१०. संस्था बदलासाठीचा अर्ज जमा केल्यानंतर सदर अर्जावरील पुढील कार्यवाही तथा पाठपुरावा संबंधित संस्थेकडून करण्यात येणार असल्याने विद्यार्थी व पालकांनी या कार्यालयास किंवा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे व्यक्तीश: भेट देऊ नये.

११. विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठीच्या विनंती अर्जात त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक नमूद करावा, जेणेकरून त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने अधिकची माहिती आवश्यक असल्यास ती तात्काळ उपलब्ध करून घेणे शक्य होईल. तसेच त्यांची विनंती मान्य झाल्यास मान्यतेचे आदेश त्यांना ई-मेल द्वारे पाठविणे शक्य होईल.

१२. पाठ्यक्रम, संस्था स्थलांतरण विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार केल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

१३. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेकडून मूळ प्रमाणपत्रं घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकांची राहील.

१४. संस्था स्थलांतरणामुळे पूर्वीच्या संस्थेतील फी परतावा किंवा अदा करावयाची असल्यास तसेच स्थलांतरणाच्या संस्थेत फी अदा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकांची राहील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती/छ.संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे. त्यांना कळविण्यात येते की,सदर परिपत्रक त्यांच्या विभागातील सर्व अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थांना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्याबाबत कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदविका महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य. त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

४. कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई. त्यांनी परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

## ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I OR II YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the Present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone/Mobile Nos. ( if any) :
   **E-mail ID** :
6. Name of Parent Institute / Present Institute with DTE Code : DTE CODE ____________ Name ______________________________
7. Course of Study Details : Year / Semester ________ Branch _____ Choice Code ____________
8. Details of the Result of last exam.

| Branch | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | Full Pass/ Pass with one ATKT | Percentage | Affiliating Body |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

9. Details of backlog subjects (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought : DTE CODE ____________ Name ______________________________
11. Branch & Year / Semester in which admission by transfer is sought : Branch / Course ______________________ Year / Semester ______________________ Choice Code______________________
12. Reasons for change of Institute/ change of branch : ______________________________
______________________________
______________________________

I, the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is upto the authority to decide my case on the basis of merit.

**Date :** / /2024 **Signature of Student**

---

Name and DTE code of the Parent Institute / Present Institute: ______________________________

No ------------------- Date :- / /2024

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ----------------------------- is verified from the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

---

Name and DTE code of the Aspiring Institute: ______________________________

No ------------------- Date :- / /2024

**No Objection Certificate**

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ____________________ to the branch ____________ to Year / Semester ______________ during the current academic year __________ . After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in ___year and course _________ are ___________ ( Nos.) (Excluding 10% additional seats for direct Second year admission.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute **Signature of the Principal**

---

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

refund of his/her fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the candidate after 5.00 P.M of the cut-off date prescribed by the Competent Authority;

**(c)** No institution, who has in its possession or custody, of any document in the form of certificates or any other documents deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such certificates or other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution. In such cases action shall be taken as per the directives given by the Government from time to time.

**(d)** The institution shall not recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.

**16. *Change of Course or Institution after First, Second Year.-***

(1) The Candidate seeking for a change in course or shift after successfully completing the First Year of studies or both first and second semester examination in full or failed in one of the heads of passing will be allowed to do so in the same institution subject to the availability of seats and changes will be carried out based on the marks of First Year or First and Second Semester together. The Principal shall be responsible for ascertaining the eligibility of the Candidates as laid down by the MSBTE for the course to which the Candidate is being transferred.

(2) Transfer of Candidates Course and / or Institution after first or second year shall be made in the following manner,-

*(a)* The Candidate once admitted in first year or second year shall not be eligible for transfer to any other institution during the same academic year;

*(b)* The Candidate passing the first year (both first and second semester) or second year (both third and fourth semester) examinations in full or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer of institution or course, provided that for transfer after second year the candidate should have passed the first year;

*(c)* The transfer of Student from the existing Institution to any other institution shall be as per the Schedule-V;

*(d)* Transfer to Unaided Institutions.- The Principal of Unaided institution shall consider the Candidates from other institutions for transfer with prior approval from the Directorate of Technical Education on submission of No Objection Certificate (NOC) from institution, Eligibility Certificate from the MSBTE and vacancy position. The Principal or Director shall ascertain the eligibility of Candidates as laid down by the MSBTE for the course to which the Candidate is being transferred;

*(e)* No Application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Directorate of Technical Education;

*(f)* If the result of the MSBTE or Institution is not declared before the process of transfer, Candidates of that Board or Institution will lose claim on transfer.

(3) The candidate not fulfilling the eligibility criteria for transfer shall not be transferred to any institute in any circumstances.

(4) The Candidates admitted under Supernumerary Quota seats are not eligible for change of Course or Institution.

(5) The candidates from the educational institutions which are outside the purview of this Rules shall be eligible for transfer to the unaided private educational institutions subject to the fulfilment of eligibility criterion and requirements as may be notified by the Government from time to time and the fulfillment of the conditions stated above in sub rule (2).

(6) List of all transfers shall be communicated to the Competent Authority for final approval.

## 17. ***Fees and Concessions-***

17.1Fees Prescribed for Government and Non-Government Aided Institutes Fee structure for the academic year 2024-25 shall be as follows:

## Schedule V

### The transfer of Student from the existing Institution to any other institution

| | | | Eligible for Transfer to Institution | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Autonomous | | | Non-Autonomous | | |
| S.N | Existing Institution | | Government Institutions | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Unaided Institutions | Government Institutions | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Unaided Institutions |
| 1 | Autonomous | Government Institutions | Eligible | Eligible | Eligible | Eligible | Eligible | Eligible |
| 2 | | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Not Eligible | Eligible | Eligible | Not Eligible | Eligible | Eligible |
| 3 | | Unaided Institutions | Not Eligible | Not Eligible | Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible |
| 4 | Non-Autonomous | Government Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible | Eligible | Eligible |
| 5 | | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible | Eligible |
| 6 | | Unaided Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ईमेल- - desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

अतितात्काळ /कालमर्यादीत

क्रमांक : १०/एडीएम/विद्यार्थी संस्था बदल/२०२४/२८९ — दिनांक : 29 JUN 2024

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे

२) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था

विषय: शैक्षणिक वर्ष **२०२४-२५** मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानित अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल **तसेच** पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमाचे माहिती पुस्तक
२) या संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एडीएम/विद्यार्थी बदली/२०२४/२७८, दि.२९/०६/२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका संस्थांमधील इच्छुक विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यासाठीचे अर्ज ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल /संस्था बदल पाहिजे आहे, अशा संस्थेत दि. ०८.०७.२०२४ पर्यंत करण्यासाठी संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकान्वये सुचित करण्यात आलेले आहे. यास्तव विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्था बदलासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही नियमानुसार कालमर्यादेत करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी खालील नियमांचे काटेकार पालन करावे.

१. या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकानुसार प्राप्त होणारे अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांची तपासणी प्राचार्य / सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन नियमातील तरतूदीनुसार करुन सोबतच्या प्रपत्रात नमुद केल्यानुसार कालमर्यादेत करावी.
२. विद्यमान संस्थेच्या संस्थाप्रमुखांनी (Present / Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये Institute DTE Code, Students Application ID, Course Choice Code, Vacancy of concern branch, GAP इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.
३. पाठ्यक्रम, संस्था स्थलांतरणास संबंधित संस्थेने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र व रिक्त जागा विचारात घेऊन मान्यतेची कार्यवाही होणार आहे. याबाबत भविष्यात रिक्त जागा नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्याचे स्थलांतरण पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. परिणामस्वरुप विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर व्यक्तीश: निश्चित करण्यात येईल.
४. संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे, त्या संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबतच्या प्रपत्रात नमूद कालमर्यादेत होईल, याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा वरिष्ठ कार्यालयांकडे त्यांचे स्तरावरुन करावा. वरिष्ठ कार्यालयात विद्यार्थी व पालकांना व्यक्तीश: पाठविण्यात येऊ नये, या बाबीची विशेष नोंद घ्यावी. तसेच पाठ्यक्रम/संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यास ते विद्यार्थ्यांना ई-मेलद्वारे संस्थास्तरावरुन पाठविण्यात यावेत.

५. संदर्भीन माहिती पुस्तकात पाठ्यक्रम, संस्था बदलाच्या तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

६. विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याचे प्राधिकार नमूद नाहीत, त्यामुळे नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नसलेल्या विद्यार्थ्यांची प्रकरणे संस्था व सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे स्तरावरुन तात्काळ निकाली काढण्यात यावीत व तसे संबंधितांना कळविण्याची कार्यवाही करावी.

७. सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलासाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्याचा संस्थेतील प्रवेश रद्द करु नये अथवा सदर रिक्त होणाऱ्या जागेवर संचालनालयाची मान्यता प्राप्त होण्यापूर्वी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

८. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची / संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांची पूर्व मान्यता नसेल तर असा संस्था बदल अनधिकृत समजण्यात येईल. संचालनालयाच्या/ विभागीय कार्यालयाच्या पूर्वमान्यतेशिवाय संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present / Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणाऱ्या संस्थेने (Aspiring Institute ) त्या लिव्हिंग सर्टिफिकेटच्या आधारे विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत कार्योत्तर मान्यता देण्यात येणार नाही याची विशेष नोंद घ्यावी. या संचालनालयाची किंवा संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याची पूर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थांच्या संस्था प्रमुखांना जबाबदार धरून त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

९. विद्यार्थी संस्था बदलाबाबतची कार्यवाही सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार कालमर्यादेत करावी. सदर कालमर्यादेपुर्वी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थी शाखा बदल, संस्था बदल, संस्थाबदलासह शाखा बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नसल्याची माहिती नियमातील तरतुदीच्या आधारे संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

१०. संस्थाबदलाबाबतचे प्रस्तावांची माहिती सोबतच्या Annexure B सह प्रस्ताव ई-मेल द्वारे सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय व या संचालनालयास मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्याच्या प्रमाणपत्रासह पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांचा Annexure A मधील विनंती अर्ज व त्यासोबतची कागदपत्रांची विद्यार्थीनिहाय स्वतंत्र ई-फाईल (PDF) ईमेल द्वारे तसेच हस्तदेय सादर करावी. तसेच "Annexure-B" ची Microsoft Excel sheet मधील Soft Copy संस्थेने सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयास व तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयांनी या संचालनालयास ई-मेलद्वारे प्रस्तावासोबत पाठवावी.

११. अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद करतांना संस्थेत शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थ्यांची पदविका पूर्ण होईपर्यंत सर्व शैक्षणिक व इतर सोई सुविधा पुरविण्याची जबाबदारी सदर संस्थेची असून तसे हमीपत्र संस्थेने अभ्यासक्रम बंद / संस्था बंद करतांना दिलेले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद झाल्यामुळे संस्था बदलास अपात्र विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याची तरतूद नाही. यास्तव टप्प्याटप्प्याने अभ्यासक्रम बंद / संस्था बंद या कारणामुळे संस्था बदलास अपात्र विद्यार्थ्यांच्या संस्था बदलाचे प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये.

१२. राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांचा टप्प्याटप्प्याने अभ्यासक्रम/संस्था बंद करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संस्थेतील उर्वरीत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अन्य संस्थांत समावेशन करण्याबाबत दि. ०१.०२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१३. पदविका अभ्यासक्रमाच्या माहिती पुस्तकातील नियम क्र. १६ (५) अंतर्गत समाविष्ट नसलेल्या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, नियमांमधील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकष व नियम १६ (२) मधील नियमाच्या पुर्ततेच्या अधिन पात्र आहेत. सबब अशी प्रकरणे संबंधित प्रथम, थेट द्वितीय वर्षात प्रवेशाच्यावेळी राज्यातील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकषांच्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यात यावीत.

१४. सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका संस्थेच्या प्राचार्यांनी संस्था बदलाबाबतची सूचना संस्थेच्या संकेतस्थळी व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी. तसेच शक्य असल्यास विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास ई-सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

१५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन संस्था बदलास दिलेली मान्यता व संस्था स्तरावरुन संस्थेअंतर्गत शाखा बदलास दिलेली मान्यता याची माहिती या संचालनालयास सादर करावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीसाठी रवाना :-

१) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

२) कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई.

प्रपत्र अ

| अ.क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि. ०९/०७/२०२४ | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे तसेच हस्तदेय पाठविण्यात यावेत. | दि. १०/०७/२०२४ | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (एकाच विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संस्था) | शासकीय, अशासकीय अनुदानीत व विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत शाखा बदल अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१-ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणाऱ्या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि. १५/०७/२०२४ | सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधून दुसऱ्या विभागीय कार्यालयांतर्गत संस्था) | सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विभागाबाहेरील स्थलांतरणासाठीच्या प्रस्तावांची संदर्भीन शासन निर्णयामधील नियम क्रमांक १६ मधील तरतदूीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालयास ईमेल द्वारे हस्तदेय पाठविण्यात यावेत. | दि. १२/०७/२०२४ | सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधून दुसऱ्या विभागीय कार्यालयांतर्गत संस्था) | सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणाऱ्या अर्जावर तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | दि. १५/०७/२०२४ | संचालक, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

## ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I OR II YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the Present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone/Mobile Nos. ( if any) :
   **E-mail ID** :
6. Name of Parent Institute / Present Institute with DTE Code : DTE CODE ____________ Name ______________________________
7. Course of Study Details : Year / Semester ________ Branch _____ Choice Code ____________
8. Details of the Result of last exam.

| Branch | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | Full Pass/ Pass with one ATKT | Percentage | Affiliating Body |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

9. Details of backlog subjects (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought. : DTE CODE ____________ Name ______________________________
11. Branch & Year / Semester in which admission by transfer is sought : Branch / Course ______________________ Year / Semester ______________________ Choice Code ______________________
12. Reasons for change of Institute/ change of branch : ______________________________ ______________________________ ______________________________

I, the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is upto the authority to decide my case on the basis of merit.

**Date :** / /2024 **Signature of Student**

---

Name and DTE code of the Parent Institute / Present Institute: ______________________________

No -------------------- Date :- / /2024

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ----------------------------- is verified from the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

---

Name and DTE code of the Aspiring Institute: ______________________________

No -------------------- Date :- / /2024

**No Objection Certificate**

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ____________________ to the branch ___________ to Year / Semester ___________ during the current academic year _________ . After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in ___year and course _________ are __________ ( Nos.) (Excluding 10% additional seats for direct Second year admission.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute **Signature of the Principal**

---

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

## Annexure B

### Statement showing the list of candidates applied for change of Institute / Branch for Second / Third year for A.Y. 2024-25

| Sr. No. | Name of the Student | Application ID | A.Y. of Admission in the current Institute | Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) | Parent / Current Institute detail | | | | | | | | Admiting / Transfer Institute | | | | | | Reason for Transfer of students ( in brief) | Remarks of Principal / Joint Director |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 1st / 2nd year ------- Engg /tech.) | Choice Code of course | Admission Year of column no. 8 | Name of affiliating body | Result [Passed / failed in one head] | % of Marks | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 2nd /3 rd year ------ Engg /tech.) | Choice Code Of course | Vacancy | Name of affiliating body | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

Seal of College / Institute / Office

Date :

Place :

Signature

(Name and Designation )

Name of Institute / Office

refund of his/her fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the candidate after 5.00 P.M of the cut-off date prescribed by the Competent Authority;

**(c)** No institution, who has in its possession or custody, of any document in the form of certificates or any other documents deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such certificates or other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution. In such cases action shall be taken as per the directives given by the Government from time to time.

**(d)** The institution shall not recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.

**16. *Change of Course or Institution after First, Second Year.-***

(1) The Candidate seeking for a change in course or shift after successfully completing the First Year of studies or both first and second semester examination in full or failed in one of the heads of passing will be allowed to do so in the same institution subject to the availability of seats and changes will be carried out based on the marks of First Year or First and Second Semester together. The Principal shall be responsible for ascertaining the eligibility of the Candidates as laid down by the MSBTE for the course to which the Candidate is being transferred.

(2) Transfer of Candidates Course and / or Institution after first or second year shall be made in the following manner,-

*(a)* The Candidate once admitted in first year or second year shall not be eligible for transfer to any other institution during the same academic year;

*(b)* The Candidate passing the first year (both first and second semester) or second year (both third and fourth semester) examinations in full or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer of institution or course, provided that for transfer after second year the candidate should have passed the first year;

*(c)* The transfer of Student from the existing Institution to any other institution shall be as per the Schedule-V;

*(d)* Transfer to Unaided Institutions.- The Principal of Unaided institution shall consider the Candidates from other institutions for transfer with prior approval from the Directorate of Technical Education on submission of No Objection Certificate (NOC) from institution, Eligibility Certificate from the MSBTE and vacancy position. The Principal or Director shall ascertain the eligibility of Candidates as laid down by the MSBTE for the course to which the Candidate is being transferred;

*(e)* No Application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Directorate of Technical Education;

*(f)* If the result of the MSBTE or Institution is not declared before the process of transfer, Candidates of that Board or Institution will lose claim on transfer.

(3) The candidate not fulfilling the eligibility criteria for transfer shall not be transferred to any institute in any circumstances.

(4) The Candidates admitted under Supernumerary Quota seats are not eligible for change of Course or Institution.

(5) The candidates from the educational institutions which are outside the purview of this Rules shall be eligible for transfer to the unaided private educational institutions subject to the fulfilment of eligibility criterion and requirements as may be notified by the Government from time to time and the fulfillment of the conditions stated above in sub rule (2).

(6) List of all transfers shall be communicated to the Competent Authority for final approval.

**17. *Fees and Concessions-***

17.1 Fees Prescribed for Government and Non-Government Aided Institutes Fee structure for the academic year 2024-25 shall be as follows:

## Schedule V

### The transfer of Student from the existing Institution to any other institution

| S.N | Existing Institution | | Eligible for Transfer to Institution | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Autonomous | | | Non-Autonomous | | |
| | | | Government Institutions | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Unaided Institutions | Government Institutions | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Unaided Institutions |
| 1 | Autonomous | Government Institutions | Eligible | Eligible | Eligible | Eligible | Eligible | Eligible |
| 2 | | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Not Eligible | Eligible | Eligible | Not Eligible | Eligible | Eligible |
| 3 | | Unaided Institutions | Not Eligible | Not Eligible | Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible |
| 4 | Non-Autonomous | Government Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible | Eligible | Eligible |
| 5 | | Government Aided/ University Departments, University Managed Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible | Eligible |
| 6 | | Unaided Institutions | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Not Eligible | Eligible |